# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## - घोषणा -

## पोलीस उपनिरीक्षक मर्यादित (विभागीय) परीक्षा

पोलीस उपनिरीक्षक मर्यादित (विभागीय) स्पर्धा परीक्षा ही यापूर्वी पूर्व व मुख्य अशा दोन टप्प्यात घेण्यात येत होती. सदर परीक्षा योजनेमध्ये बदल करण्यात आला असून पोलीस उपनिरीक्षक मर्यादित (विभागीय) स्पर्धा परीक्षा ही यापुढे फक्त एकच टप्प्यात (मुख्य परीक्षा व त्यानंतर शारीरिक चाचणी ) घेण्यात येणार आहे.

पोलीस उपनिरीक्षक मर्यादित (विभागीय) मुख्य परीक्षेच्या अभ्यासक्रमात कोणताही बदल करण्यात आला नसून अभ्यासक्रमामधील गुणदानामध्ये बदल करण्यात आला आहे. सुधारित परीक्षा योजना व अभ्यासक्रम उमेदवारांच्या माहितीसाठी **www.mpsc.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

सदर परीक्षा योजना व अभ्यासक्रम ' **पोलीस उपनिरीक्षक मर्यादित (विभागीय) परीक्षा' ही** सन - 2013 मध्ये घेण्यात येणा-या परीक्षेपासून लागू राहील याची कृपया नोंद घ्यावी.

**विजया पडते**

उपसचिव (गोपनीय)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
मुंबई

दिनांक :- 5 ऑक्टोबर, 2013
ठिकाण :- मुंबई